गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक ४७ वा ● बुधवार ०३ जुलै २०२४ ● पाने ४ ●किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 47 | Date : 03/07/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## काँग्रेसने अखख्या हिंदू समाजाचा अपमान केला

### काँग्रेस पक्ष 'परजीवी काँग्रेस' म्हणून ओळखला जाईलं : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचा 'बालकबुद्धी' असा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी लोकसभेत काँग्रेसवर हल्ला चढवला. काँग्रेसने अखख्या हिंदू समाजाचा अपमान केला असून देश कधीही माफ करणार नाही, असे ठणकावतानाच काँग्रेस देशात अराजक माजवत असून जनतेने काँग्रेसच्या खोटेपणापासून आणि षड्यंत्रांपासून सावध राहिले पाहिजे, असा इशारा मोदींनी दिला.राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान राहुल गांधींनी मोदी व भाजपच्या धोरणांचे वाभाडे काढले होते.

राहुल गांधींच्या प्रत्येक मुद्द्याला मोदींनी



सव्वादोन तासांच्या भाषणामध्ये तितकेच कडवे प्रत्युत्तर दिले. 'काँग्रेसच्या देशविरोधी कारस्थानांना मोदी घाबरत नाही, माझे सरकारही घाबरत नाही. 'विकसीत भारता'चा संकल्प आम्ही पूर्ण करू. २०१४ आणि २०१९ मध्ये विरोधकांनी मला आत्ता इतकाच विरोध केला होता. पण, माझी उमेद, माझा आवाज तितकाच बुलंद झालेला आहे', अशा शब्दांत मोदींनी काँग्रेससह विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीच्या लोकसभेतील वाढलेल्या ताकदीलाच आव्हान दिले.

'काँग्रेसने माजवलेल्या कोलाहलामध्ये सत्याचा आवाज कधीही दबून जाणार नाही. खोटेपणाला मुळे नसतात, हा खोटेपणा टिकणार नाही. लोकसभेमध्ये मला सत्याची ताकद पाहायला मिळाली, त्याचा मला आनंद होत आहे', असे म्हणत मोदींनी राहुल गांधींना अप्रत्यक्ष टोला दिला. राहुल गांधींच्या भाषणातील काही भाग कामकाजातून काढून टाकल्यानंतर, मोदींच्या जगात सत्य लपू शकते पण, वास्तव जगात सत्याचा आवाज कधीही दबून राहणार नाही, अशी प्रतिक्रिया राहुल गांधींनी दिली होता.

२०२४ मधील काँग्रेस पक्ष 'परजीवी काँग्रेस' म्हणून ओळखला जाईल, अशी टीका मोदींनी केली. मित्र पक्षांना संपवून काँग्रेस टिकून राहण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपविरोधातील थेट लढाई काँग्रेसचे जिंकणारे प्रमाण (स्ट्राइक रेट) फक्त २६ टक्के होते. मित्र पक्षांची मदत मिळाली तिथे हे प्रमाण ५० टक्क्यांवर गेले. काँग्रेसला मिळालेल्या ९९ जागा मित्र पक्षांच्या मदतीनेच मिळाल्या आहेत, असे मोदी म्हणाले.

काँग्रेस देशात अराजक परसवत असून जनतेने सावध राहिले पाहिजे. । **पान २ वर**

## विधान परिषद निवडणुकीची चुरस वाढली



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

विधानसभेत पुरेसे संख्याबळ नसतानाही महाविकास आघाडीने विधान परिषद निवडणुकीत तिसरा उमेदवार रिंगणात उतरवल्याने या निवडणुकीतील चुरस वाढली आहे. विधान परिषदेच्या ११ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवार, २ जुलै हा शेवटचा दिवस होता. या दिवशी एकूण १२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. या अर्जांची बुधवारी छाननी होणार असून ५ जुलैला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे.

त्यामुळे अर्ज माघारीच्या दिवशी विधान परिषद निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. विधान परिषदेच्या ११ सदस्यांची मुदत येत्या २७ जुलै २०२४ रोजी संपत आहे. या रिक्त होऊ घातलेल्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यानुसार भाजपच्या ५, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या प्रत्येकी २ तर, काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि शेतकरी कामगार पक्षाच्या प्रत्येकी १ उमेदवाराने उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे आजघडीला ११ जागांसाठी १२ अर्ज आल्याने विधान परिषद निवडणुकीची शक्यता वाढली आहे. यांचे अर्ज दाखल भाजप : पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, डॉ. परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत. शिवसेना (शिंदे गट) : भावना गवळी, कृपाल तुमाने.राष्ट्रवादी अजित पवार गट : राजेश विटेकर, शिवाजीराव गर्जे. काँग्रेस : डॉ. प्रज्ञा सातव. शिवसेना (ठाकरे गट) : मिलिंद नार्वेकर शेकाप : जयंत पाटील.

## सोलापूर व बारामतीत घरफोड्या करणाऱ्या संशयिताला अटक; २८.४१ लाखांचे सोने-चांदी हस्तगत



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः : सोलापूर शहरासह बारामती परिसरात घरफोड्या केलेल्या एका संशयिताला सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून घरफोड्यांतून लांबविले गेलेले ३९ तोळे सोने आणि १८ किलो चांदी या किंमती ऐवजासह गुन्ह्यात वापरली गेलेली मोटार व अन्य साहित्य असा सुमारे २८ लाख ४१ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. राजकुमार पंडित विभूते (वय ४२, रा. बोरामणी,। **पान २ वर**

## अंबादास दानवेंचं पाच दिवसांसाठी निलंबन; विधानपरिषदेत ठराव संमत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरु असून अधिवेशनामध्ये सत्ताधारी आणि विरोधक विविध मुद्यांवरून आमने-सामने येत असल्याचं पाहायला मिळत आहे. सोमवारी (१ जुलै) विधान परिषदेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या आमदारांमध्ये राडा झाला होता. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भाजपाचे आमदार



प्रसाद लाड यांच्यावर खालच्या पातळीवर टीका आणि शिवीगाळ केल्याचा आरोप भारतीय जनता पार्टीकडून करण्यात येत आहे. यानंतर आता विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे पाच दिवसांसाठी निलंबन करण्यात आले आहे.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या वक्तव्यावर भारतीय जनता पार्टीचे आमदार । **पान २ वर**

## 'लाडकी बहीण योजने'साठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत; मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे कोणती ?**

आधार कार्ड ✻ जात प्रमाणपत्र ✻ मूळ निवासी प्रमाणपत्र ✻ रेशन कार्ड ✻ उत्पन्नाचा दाखला ✻ बँकेचे पासबूक ✻ मोबाईल क्रमांक ✻ पासपोर्ट साईज फोटो ✻ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज फॉर्म

**माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज कुठे करायचा ?**

✻ ग्रामीण भागातील महिलांनी ग्रामसेवक किंवा अंगणवाडी सेविकांकडे नोंदणी करावी ✻ शहरी भागातील महिलांनी वॉर्ड ऑफिसरकडे नोंदणी करावी.

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली



झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यावेळी उपस्थित होते.

या योजनेसाठी नाव नोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढवण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करणाऱ्या महिलांना १ जुलैपासून लाभ देण्यात येईल असा महत्वपूर्ण निर्णय घेताना योजना सुलभ आणि सुटसुटीतपणे राबवण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला दिले.

अर्ज करण्यासाठी मुदतवाढ । **पान २ वर**

## पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात ३२ नवीन ग्रामपंचायत कार्यालयांना मंजूरी : आ.आवताडे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मंगळवेढा/प्रतिनिधीः तालुक्यामध्ये ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना योजनेअंतर्गत मतदारसंघात ३२ गावांना नवीन ग्रामपंचायत कार्यालये मिळाले असून त्यांना आता हक्काचे कार्यालय मिळणार असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी बोलताना दिली.शासनाने सुरू केलेल्या बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत ही कार्यालये मंजूर झाली असून या इमारत बांधकामांमध्ये शासन ग्रीन बिल्डींग संकल्पना अमलात आणणार असून नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुविजन,



पाण्याचा व ऊर्जेचा काटकसरीने वापर,पर्जन्य जल पुनर्भरण, आणि जास्तीत जास्त पर्यावरण पूरक बांधकाम साहित्य व साधनसामुग्रीचा त्यामध्ये वापर करण्यात येणार आहे. कामाच्या निविदा झाल्यापासून एक वर्षाच्या आत बांधकाम पूर्ण होईल याचे नियोजन करण्याची जबाबदारी संबंधित बांधकाम । **पान २ वर**

## आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर जिल्हाधिकारी यांनी केली विविध ठिकाणांची पाहणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार आहे. आषाढी यात्रा कालावधीत सुमारे १५ लाखांहून अधिक भाविक येण्याची शक्यता असून, पंढरपूरात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला आषाढी यात्रा कालावधीत प्रशासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या पार्श्र्वभूमिवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्राशेड दर्शन रांग, वाळंवट, ६५ एकर, भीमा बसस्थानक तसेच पालखी मार्ग व तळांची पहाणी केली.यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी सचिन इथापे, अमित माळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसिलदार सचिन लंगुटे, सुरेश शेजुळ, गटविकास अधिकारी सुशील संसारे,मुख्याधिकारी प्रशांत जाधव, सा.बां.कार्यकारी अभियंता अमित निंबकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दर्शनरांगेत भाविकांची घुसखोरी होणार नाही यांची दक्षाता घेवून डबल बॅरेकेटींग करुन आवश्यक सुरक्षा व्यवस्था ठेवावी. दर्शन रांगेत वि.प्र. दत्त घाटावर स्कायवॉक



लावण्याबाबत तात्काळ नियोजन करावे. जेणे करुन इतर घाटावरील भाविकांची गर्दी कमी होईल. महाव्दार व चंद्रभागा घाटांवर बॅरेकेटींग करावे. जुना दगडी पुलांवर बॅरेकेटींग व लाईटची व्यवस्था करावी. ६५ एकर येथे नळाच्या स्टॅण्ड पोस्टची संख्या वाढवावी. भीमा बसस्थानकावर मुबलक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. टॉयलेटसाठी वापरण्यात आलेला जुना पत्रा तत्काळ काढून नवीन पत्रा लावावा तसेच मुरमीकरण करावे. तसेच पालखी तळांवर वारकरी भाविकाच्या सुविधेसाठी उपलब्ध टॉयलेट, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, विद्युत सुविधा, स्नानगृह, अग्नीशमन व्यवस्था आदी ठिकाणची पाहणी करुन आवश्यक सूचना दिल्या.तसेच होडीचालकांना होडीमध्ये लाईफ जॅकेटची उपलब्धता करुन देण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यावेळी सांगितले.

**गुजराती कॉलनीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर शहरातील गुजराती कॉलनीला भेट देवून सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या यावेळी कुमार आशीर्वाद म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलांना शिष्यवृती देण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून, सफाई कर्मचाऱ्यांच्या जिल्हास्तरावर मार्ग निघणाऱ्या ज्या मागण्या आहेत त्या मागण्या पुर्ण करण्यात येतील. शासनस्तरावरील मागण्याबाबत प्रशासनाकडून वेळोवेळी पाठपुरावा करुन त्या पुर्ण करण्यात येतील. आषाढी यात्रेच्या पार्श्र्वभूमीवर मा. मुख्यमंत्री शासकीय महापुजेसाठी उपस्थित राहणार आहेत. यावेळी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे सफाई कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करुन देण्याच्या मागणीबाबत सफाई कर्मचाऱ्यांच्या । **पान २ वर**

# संपादकीय

## 'कवच' प्रणालीबाबत प्रश्न

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर, संपूर्ण देशातच हे चित्र आहे. वस्तुत: ज्यांच्यासाठी हा प्रकल्प उभा राहिलेला आहे, त्यांना हे माहीत असते की, कोणामुळे तो पूर्णत्वास आला आहे. उलट, या श्रेयवादातच एखादा कल्याणकारी प्रकल्प अडकतो, हेही वास्तव आहेच. पश्चिम बंगालमधील न्यू जलपायगुडी येथे अलीकडे मालगाडी आणि कांचनजंगा एक्स्प्रेस यांचा अपघात झाला. रुळावर उभ्या असलेल्या कांचनजंगा एक्स्प्रेसला मागून येणाऱ्या मालगाडीने जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की मालगाडीचा संपूर्ण डबा हवेत लटकला. दोन्ही ट्रेनचे अनेक डबे रुळावरून घसरले. यात जवळपास दहाजणांचा मृत्यू झाला. या अपघाताला मालगाडीचा ड्रायव्हर दोषी असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. सिग्नल यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्यामुळे त्याला गाडीचा वेग ताशी पंधरा किलोमीटर ठेवण्याची सूचना देण्यात आली होती, पण त्याने याकडे दुर्लक्ष करत गाडीचा वेग ताशी ४५ किलोमीटर ठेवला होता, असे सांगण्यात येते. एखादी दुर्घटना घडली की, त्यातील त्रुटींकडे कसे दुर्लक्ष झाले, प्रशासकीय दिरंगाई आणि खाबूगिरी यांची चर्चा रंगते. सरकारलाही जाग येते, मग त्याची 'उच्चस्तरीय' चौकशी जाहीर होते. मग संबंधित संस्थांचे ऑडिट सुरू होते. स्पष्ट शब्दात सांगायचे झाले तर अशा घटना प्रशासकीय स्तरावर 'वर कमाई'चा मार्ग असतो. याचा कोणीही कितीही इन्कार केला तरी सर्वसामान्यांना त्याची कल्पना असते. कांचनजंगा एक्स्प्रेसच्या अपघातानंतर रेल्वे प्रशासनाच्या बहुचर्चित 'कवच' प्रणालीची चर्चा सुरू झाली. त्याला सरकारकडून किंवा रेल्वे प्रशासनाकडून अद्याप समाधानकारक उत्तर आलेले नाही. फक्त चर्चा सुरू आहे. अशीच चर्चा गेल्यावर्षी ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यात झालेल्या रेल्वे अपघातानंतर रंगली होती. तिथे बहनगा बाजार स्थानकावर कोरोमंडल एक्स्प्रेसने स्टेशननजीकच्या लूपलाइनवर उभ्या असलेल्या मालगाडीला धडक दिली. त्याचवेळी डाऊन मार्गावरून जात असलेल्या बंगळुरू-हावडा एक्स्प्रेसचे शेवटचे दोन डबे रुळावरून घसरलेल्या कोरोमंडल एक्स्प्रेसच्या डब्यांवर आदळले आणि उलटले होते. यामध्ये २८० हून अधिक प्रवाशांचा मृत्यू झाला होता. रेल्वेच्या इतिहासातील सर्वात भीषण अपघात होता. पश्चिम बंगाल असो की ओडिशा असो दोन्ही अपघातांनंतर नॅशनल ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन सिस्टीम म्हणजेच 'कवच' प्रणालीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला.

# पंढरीची समाजसेवक मुजमिल कमली वाले यांचा पुण्यात गौरव

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः समाजसेवेनी पछाडलेला युवक प्रारंभिक शहरी सारख्या शिक्षण क्षेत्रात अव्वल ठरलेल्या संस्थेमधून फार्मसीचे शिक्षण पूर्ण करून उद्योग धंदा आपले घर आपला परिवार पाहण्याच्या वयात तो स्वस्त न बसता प्रामाणिक समाजसेवा करू लागतो खरंतर कोरोना महामारीनंतर मुजमील कमली वाले मतेचा हात देऊ लागली वेळ प्रसंगी पदरमोड करू लागले व त्यांचे हे समाजकार्य अल्पावधीतच सर्व दूर पोहोचले समाजकार्य पाहून अनेक सामाजिक संघटना विविध पुरस्काराने त्यांना सन्मानित केले होय मुजम्मिल कमले वाले या त्या युवकाचे.त्याचे नाव पुणे येथील महाराष्ट्र राज्याच्या वतीने पत्रकार सभागृहात पार पडलेल्या भरगच्च कार्यक्रमात कोरोना काळात केलेली मदत व त्यांच्या समाजकार्य दखल घेऊन टॅलेंट कट्टा या संस्थेने घेतली प्रमुख पाहुणे ऑफ इंडिया नॅशनल बँकिंगचे प्रोसिडिटीत डॉक्टर राजेंद्र सिंग वालिया व कृषी आयुक्तालयातील तंत्र अधिकारी अनिल इंडियन टॅलेंट अवॉर्ड २०२ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले मानाचा फेटा मानपत्र सन्मान चिन्ह गौरव पदक देऊन कमली वाले यांना सन्मानित करण्यात आले यावेळी टॅलेंट कट्टा ग्रुपचे अध्यक्ष डॉक्टर दीपक दादाराव जाधव वर्ल्डस स्किल बुक ऑफ रेकॉर्ड व युवा उद्योजक अध्यक्ष कंपनीचे अध्यक्ष नितीन ढवणे यांच्यासह सहकारी उपस्थित होते यांना मुजमबिल कमली वाले यांना पुरस्कार एक ऊर्जा मिळाली असून आयुष्यात अशीच समाजसेवा सुरू ठेवणार असले की त्यांनी आवर्जून सांगितले यावेळी कृतज्ञता व्यक्त करताना ग्रुपचे अध्यक्ष डॉक्टर दीपक जाधव यांच्या समाजसेवक मुस्लिम बिल कमले वाले यांनी तुळशीचा हार व विठ्ठलाची आकर्षक मूर्ती आणि प्रसाद देऊन त्यांचा सत्कार केला



# भिगवणजवळ मोटार उलटून तेलंगणातील पाच तरुणांचा मृत्यू; एक जण गंभीर जखमी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

इंदापूर/प्रतिनिधी : पुणे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या मोटारीवरील ताबा सुटल्याने मोटार उलटून झालेल्या अपघातात पाच जण ठार, तर एक जण जखमी झाला. भिगवणजवळील डाळज (ता. इंदापूर) येथे मंगळवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. रफिक कुरेशी (वय ३४), इरफान पटेल (वय २४), मेहबूब कुरेशी (वय- २४) फिरोज कुरेशी (वय २८) फिरोज कुरेशी (वय २७) (सर्व रा. नारायणखेड, जिल्हा मेंढक, तेलंगणा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणांची नावे आहेत. आहेत.सय्यद इस्माईल अमीर (वय २३) हा तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर भिगवणमध्ये उपचार सुरू आहेत. तेलंगणा राज्यातील सहा युवक पर्यटनासाठी महाराष्ट्रात आले होते. ते घरी जात असताना भिगवणजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मोटार उलटली. त्यामुळे ही दुर्घटना घडली. इंदापूर तालुका परिसरामध्ये चार वाजण्याच्या सुमारास जोरदार पाऊस कोसळत होत्या. अपघात झाला त्या ठिकाणी उतार ओलांडून मोटार पुढे आली होती. मोटार भरघाव वेगाने असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले. मोटार तीन चार वेळा उलटल्याने पाचजणांचा जागीच मृत्यू झाल्याचे भिगवण पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांनी सांगितले.

# स्वावलंबी शेतकऱ्यांच्या सन्मानाने सोलापुरात कृषी दिन साजरा



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने कृषी दिन साजरा केला जातो त्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषद कृषी विभाग महाराष्ट्र शासन व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने बहुउद्देशीय सभागृह जुने जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी अतिशय उत्साहात कृषी दिन साजरा करण्यात आला

याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनूरकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दत्तात्रय गावासनी जिल्हा कृषी अधीक्षक व कृषी अधिकारी होते जिल्हा परिषदेच्या मुख्य वित्त व लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती व या कार्यक्रमात जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा या ठिकाणी करण्यात आला जिल्ह्यातील कमी कालावधी वीर पूर्ण केलेले शेतकऱ्यांचे पूर्णत्वाचा दाखला वितरण त्याचप्रमाणे या कीटकनाशक या फवारणी करताना घ्यावयाची काळजी याची अभिनंदन पाटील यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले तर लागवड सोयाबीन लागवड या विषयावर ड्रॉ लालासाहेब तांबडे त्याचप्रमाणे जिवाणू खत व्यवस्थापन या विषयावर ड्रॉ देवी डी दिवसातज्ञ यांचे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते

प्रश्नाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या वतीने शेतकरी पिक स्पर्धा यामध्ये राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना व महिला शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला त्याचबरोबर कृषी विभाग जिल्हा परिषद व शासन स्तरावरील ज्यांनी उल्लेखनीय कामकाज केले असे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे उत्पादित मालाला बाजारपेठ कसे उपलब्ध होईल आणि उत्पादन मालमत्ता मिळणारे उत्पन्न हे नेहमी प्लस मध्ये असावे अशा पद्धतीचे नियोजन करावे त्याचप्रमाणे जिल्हा परिषद सेस योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनूरकर शेतकरी बचत गटांना प्रात्यक्षिक कीट वाटप करण्यात आले

प्रारंभी जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी नंदकुमार पाच कुडवे यांनी प्रास्ताविक केले तर शीतल चव्हाण संचालक आत्मा व मदन मोहने संचालक स्मार्ट प्रकल्प राजकुमार मोरे उपसंचालक यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपविभागी कृषी अधिकारी मनीषा मिसाळ यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रशासन अधिकारी विवेक लिंगराज कृषी अधिकारी कल्याण वस्ती यांनी केली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा कृषी अधिकारी सागर बारवकर मोहीम अधिकारी अशोक मोरे रामचंद्र माळी आंबेगाव वाघमोडे मिथुन भिसे राजश्री काँग्रेस काटे शंकर पाटील सुरेश राठोड मल्लिनाथ स्वामी शंकर पाथर्डी लक्ष्मण वंजारी अरुण पाचा नदाफ श्रीकांत कोष्टी ओम प्रकाश कोकणे शंकर पाटील रोहित शिंदे राम कांबळे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आवळे यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात येऊन कृषी दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या

पान १ वरुन

## आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर ..

वतीने मागणी मांडणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. यावेळी नगर पालिका प्रशासनाकडून गुजराती कॉलनीत सफाई कर्मचाऱ्यांचे घरावरील बदलले पत्रे, शौचालय व्यवस्था व दुरुस्ती आदीची पाहणी जिल्हाधिकारी यांनी केली. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, अमित माळी, तहसिलदार सचिन लंगुटे, सुरेश शेजुळ, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, उपमुख्यधिकारी सुनिल वाळुंजकर, आरोग्य निरिक्षक शरद वाघमारे, नागनाथ तोडकर तसेच सफाई कर्मचारी उपस्थित होते. यावेळी गुरु दोडीया यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या तसेच मागण्याबाबतची माहिती देवून त्या तातडीने सोडविण्याची मागणी यावेळी केली.

## पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात ..

खात्याकडे देण्यात आली असून दर तीन महिन्याला या बांधकामाच्या प्रगतीचा अहवाल शासन घेणार असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.यामध्ये मंगळवेढा तालुक्यातील मल्लेवाडी,डिकसळ, देगाव, आसबेवाडी,धर्मगाव, ढवळस, उचेठाण,कात्रळ,भालेवाडी, हाजापुर, हिवरगाव, शिवणगी,पौट, सलगर खुर्द,यड्राव,मानेवाडी, पडोळकरवाडी, चिखलगी,शेलेवाडी, खडकी,महमदाबाद(शे),सोड्डी या गावांना प्रत्येकी २० लाख रुपये तर माचनूर,जालीहाळ,खुपसंगी, पाटखळ,कचरेवाडी,डोंगरगाव,संत दामाजी नगर, संत चोखामेळा नगर,लोणार या गावांना प्रत्येकी २५ लाख व पंढरपूर तालुक्यातील एकलासपूर ग्रामपंचायतला २० लाख रुपये इमारत बांधकाम करण्यासाठी मिळणार आहेत.

## 'लाडकी बहीण योजने'साठी अर्ज

देताना योजनेसाठी एकर शेतीची अट वगळण्याचा, लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगटाऐवजी २१ ते ६५ वर्षे वयोगट करण्याचा, परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीच्या जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, आधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल, असा निर्णय यावेळी घेण्यात आला.

२.५ लाख रुपये उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशन कार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार असून योजनेमध्ये सुधारणा केलेल्या निर्णयांचा शासन निर्णय तातडीने जाहीर करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

## सोलापूर व बारामतीत घरफोड्या..

ता. दक्षिण सोलापूर) असे या घरफोड्यांच्या गुन्ह्यांतील आरोपीचे नाव आहे. सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीसमोरील चौकात पहाटे संशयास्पदरीत्या फिरताना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्यास हटकले. त्यास पोलिसी खाक्या दाखविताच त्याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या एका घरफोडीची कबुली दिली. नंतर पोलीस कोठडीत असताना त्याने मागील वर्षात आणखी पाच घरफोड्या केल्याची कबुली दिली. यात जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन, फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक आणि बारामती पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन याप्रमाणे घरफोड्यांची माहिती समोर आली.

या सर्व गुन्ह्यांत लंपास केलेले १६ लाख ४९ हजार रूपये किंमतीचे ३८.९ तोळे सोन्याचे दागिने, सहा लाख ७३ हजार रूपये किंमतीचे १७.८३० किलो वजनाचे चांदीचे अलंकार व दागिने असा ऐवज हस्तगत करण्यात आला. तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटार आणि घरफोड्या करून लंपास केलेले सोन्याचे दागिने वितळविण्यासाठी वापरात असलेले यंत्र आणि अन्य साहित्यही जप्त करण्यात आले. याबाबतची माहिती पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी दिली. हे घरफोड्यांचे गुन्हे उजेडात आणण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या पथकाने कामगिरी केल्याचे राजकुमार यांनी सांगितले.

## अंबादास दानवेंचं पाच दिवसांसाठी

आक्रमक झाले होते. भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांनी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. तसेच यासाठी आमदार प्रसाद लाड यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं होतं. त्यानंतर विधानपरिषदेमध्येही सत्ताधाऱ्यांनी आक्रमक होत अंबादास दानवे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी काही वेळासाठी कामकाज स्थगित केले होते. त्यानंतर पुन्हा कामकाज सुरु झाले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे चंद्रकांत पाटील यांनी अंबादास दानवे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यासंदर्भात सभागृहात प्रस्ताव मांडला. यानंतर विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी निलंबन केलं. तसेच या पाच दिवसांमध्ये अंबादास दानवे यांना सभागृहात येण्यासंही बंदी असेल असंही सांगितलं.

## काँग्रेसने अख्ख्या हिंदू

कधी दक्षिण विरुद्ध उत्तर तर, कधी भाषांच्या मुद्द्यांवरून फूट पाडली जात आहे. काँग्रेस लोकांना जाती-जातींमध्ये लढवत आहे. लोकांमध्ये वेगवेगळ्या अफवा पसरवल्या जात असून आर्थिक अराजकही माजवण्याचे कटकारस्थान काँग्रेस करत आहे. काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये घेतले जाणारे आर्थिक निर्णय देशावर आर्थिक ओझे बनेल. तसा जाणीपूर्वक खेळ काँग्रेस खेळत आहे. काँग्रेसने 'सीएए'वरून अराजक माजवले. दंगली भडकवण्याचा प्रयत्न होत आहे, असा गंभीर आरोप मोदींनी केला.

काँग्रेसने संसदेच्या अधिवेशनामध्ये देखील 'संविधान बचाव'चा नारा दिला असून राहुल गांधींनीही भाषणामध्ये भाजप संविधानविरोधी असल्याचा आरोप केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना मोदींनी काँग्रेसच संविधानविरोधी, दलित-ओबीसी आणि आरक्षणविरोधी असल्याचा दावा केला. 'संविधान डोक्यावर घेऊन इथे नाचणाऱ्यांनी जम्मू-काश्मीरमध्ये संविधान लागू करण्याची हिंमत दाखवली नाही. त्यांनी अनुच्छेद ३७०ची तरफदारी केली. आम्ही सत्तेवर ल्यावर ३७० रद्द केले, तिथे संविधान लागू केले. तिथल्या जनतेला हक्क मिळवून दिला. ३७०ची भिंत पाडली, दगडफेक बंद पडली, तिथे लोकशाही मजबूत झाली, तिथल्या जनतेचा लोकशाहीवरील विश्र्वासही वाढला, असे मोदी म्हणाले.

गेल्या तीन निवडणुकीत काँग्रेसला शंभर जागादेखील मिळवता आलेल्या नाहीत. काँग्रेसचा हा तिसरा मोठा पराभव आहे. खरेतर काँग्रेसने आत्मपरिक्षण केले पाहिजे. काँग्रेसने विकासामध्ये अडथळे आणण्याचा प्रयत्न करू नये. त्यांच्या प्रत्येक षडयंत्रांना त्यांच्याच भाषेत उत्तर दिले जाईल. देशविरोधी कारस्थान आम्ही सहन करणार नाही, असा इशाराही मोदींनी दिला.

मोदींचे भाषण सुरू असताना काँग्रेसह 'इंडिया' आघाडीतील सर्व घटक पक्षांनी सभागृहात मोदीविरोधी घोषणाबाजी करून गोंधळ माजवला. या गोँधळातच मोदींनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या चर्चेला उत्तर दिले. विरोधकांनी मोदींची हुर्ये उडवली. मोदींनी भाषणात मणिपूरचा उल्लेख केला नाही. त्याबद्दल मणिपूर- मणिपूर, तानाशाही नही चलेगी, जस्टिस फॉर मणिपूर, जय संविधान अशा घोषणांनी सभागृह दणाणून गेले होते. मोदींच्या भाषणातील मुद्द्यावर जोरदार टाळ्या सत्ताधारी बाकांवरील सदस्य विरोधकांना जशास तसे उत्तर देण्याचा प्रयत्न करत होते. मोदींनी भाषणादरम्यान तीन-चार वेळा पाणी पिण्यासाठी क्षणभर थांबले. एकदा तर मोदींनी घोषणाबाजी करणाऱ्या काँग्रेसचे खासदार मणिकम टागोर यांना पाण्याचा ग्लास देऊ केला. पण, नम्रतेने टागोरांनी तो नाकारला! विरोधक तब्बल दोन तास न थकता घोषणाबाजी करत होते. लोकसभाध्यक्ष ओम बिर्लांनी आसनावर बसण्याची विनंती फेटाळून लावली.

काँग्रेसने संविधानाचे रक्षणकर्ता असल्याचाही खोटेपणा केला आहे. आणीबाणी लादून क्रुरतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या. दलित, ओबीसींवर अन्याय केला. काँग्रेसच्या दलित विरोधी धोरणांमुळेच डॉ. आंबेडकरांनी नेहरूंच्या मंत्रिमंडळातून राजीनामा दिला होता. डॉ. आंबेडकरांना निवडणुकीत पराभूत केले गेले, त्यांचा पराभव साजरा केला गेला. इंदिरा गांधी मंडलविरोधी होत्या. राजीव गांधी आरक्षणविरोधी होते, असा आरोप मोदींनी केला. काँग्रेसना खोटेपणाला राजकारणाचे हत्यार बनवले आहे. काँग्रेसने देशाची दिशाभूल केली आहे. महिलांना ८,५०० रुपये देण्याचे आश्र्वासन दिले होते, तिचे काय झाले? काँग्रेसने मतदानयंत्र, संविधान, आरक्षण, राफेल, एचएएल, एलआयसी, बँक अशा अनेकांबद्दल खोटे बोलण्याचा प्रयत्न केला. खोटेपणा काँग्रेसच्या नसानसांत मुरलेला असून हा खोटेपणा जनतेच्या विवेकाच्या कानाखाली मारण्याचा निर्लज्जपणा काँग्रेसने केला आहे. काँग्रेसला तिसऱ्यांदा विरोधी बाकांवर बसण्याचे जनमत मिळाले आहे. तर्क संपले असतील तर फक्त आरडत राहा, अशी उपहासात्मक टिप्पणी मोदींनी केली.

### सुविचार

- श्रीमंत होण्यापेक्षा गुणवंत व्हा.
- मनुष्य हा मरेपर्यंत विद्यार्थी असतो.
- ढीगभर आश्वासनापेक्षा टीचभर मदत बरी.
- मानवसेवा हीच ईश्वर सेवा.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# तलाठी कार्यालयात तुफान गर्दी उत्पन्न दाखला मिळवण्यासाठी महिलांची तोबा गर्दी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी:नुकतीच महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी कल्याणकारी लाडकी बहीणही योजना व या योजनेची घोषणा केलेली असून या लाडकी बहीण या योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्रातील वय वर्षे २१ ते ६० वयापर्यंत या महिलांसाठी मराठी शासनाने त्यांच्या बँक खात्यामध्ये बाराशे ते पंधराशे रुपये दरमहा जमा करण्याचे नियोजन केलेले आहे

महाराष्ट्रातील महिला व स्वावलंबी व्हायला हवी या सोबत स्वबळावर त्यांनी उभे राहावे या उद्देशाने महाराष्ट्रातील सर्व महिलांसाठी लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेली असून त्याचा लाभ महाराष्ट्रातील महिलांना होणार आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मध्यप्रदेश सरकारने या निवडणुकीपूर्वी लाडली बहन या योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी त्यांनी ही योजना राबवली या योजनेला प्रतिसाद म्हणून मध्य प्रदेश मधील भाजपा सरकारला महिलांनी भरपूर मतदान केले ही मध्य प्रदेशची योजना महिलांना भाजपकडे आकर्षित केली जाऊ शकते



या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील महिलांना आपल्याकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने लाडकी बहीण ही योजना सुरू केली असून या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील महिलांना होणार आहे. या योजनेअंतर्गत लागणारी कागदपत्रे ही गोळा करण्यासाठी पंढरपूर तसेच महाराष्ट्रातील अन्य शहरांमधून उत्पन्नाचे दाखले व अन्य कागदपत्रे गोळा करण्यासाठी महिलांची झुंबड उडालेली दिसून येत आहे

पंढरपूर येथील तलाठी कार्यालयाच्या बाहेर असंख्य महिलांनी उत्पन्नाचा दाखला मिळावा म्हणून गर्दी केलेली आज दिसून आले ही गर्दी पाहता महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी उत्पन्नाचे दाखले अन्य कागदपत्रे मिळवण्याच्या उद्देशाने अन्य ठिकाणी देखील असे उत्पन्नाचे दाखले मिळवण्याची योजना व सुविधा उपलब्ध करून घ्याव्यात अशी मागणी देखील या ठिकाणी जमलेल्या महिलांनी केलेली आहे शासनाच्या या योजनेला महिला या प्रचंड प्रमाणात प्रतिसाद देत आहेत त्यासाठी शासनाने देखील महिलांना या योजनेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे लवकरच मिळवण्यासाठी अन्य ठिकाणी देखील या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात त्यांना त्वरित दाखले मिळावेत अशी अपेक्षा या महिला वर्गात केली जात आहे

# दुसऱ्या संत चोखामेळा साहित्य संमेलन अध्यक्षपदी प्रा.डॉ संदीप सांगळे यांची निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधी : संत चोखामेळा अध्यासन केंद्र व वृंदावन फाऊंडेशन , पुणे आयोजित दुसऱ्या संत चोखामेळा साहित्य संमेलन २०२४ अनुषंगाने संबंधित सहयोगी संस्थाची बैठक संत चोखामेळा अध्यासन केंद्राच्या अध्यक्षा प्राचार्या उल्काताई चंदनशिवे – धावारे यांच्या मार्गदर्शनात पार पडली. या बैठकीत संत चोखामेळा महाराज व परिवारातील संताच्या साहित्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी दुसरे संत चोखामेळा साहित्य संमेलन घेण्यासंदर्भात चर्चा होऊन तीर्थक्षेत्र पैठण या ठिकाणी हे साहित्य संमेलन घेण्याचे नियोजित करण्यात आले. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून संत सोयराबाई यांच्या साहित्याचे अभ्यासक , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे च्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली .

' मध्ययुगीन दलित संतकविता : सामाजिक व वाङमयीन मुल्यमापन ' या संशोधनपर ग्रंथाद्वारे त्यांनी संत सोयराबाई सह चोखामेळा कुटूंबातील सदस्यासोबतच कान्होपात्रा सह अन्य वारकरी संतांच्या साहित्यकृतीचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे . संत साहित्यात विशेष रुची असणारे प्रा. डॉ. संदीप सांगळे हे शिक्षण प्रसारक मंडळाच्या , तळेगांव ढमढेरे येथील साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालयात प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत . संत साहित्य सोबतच सामाजिक व अन्य साहित्यकृती असे विपुल लेखन त्यांनी केले आहे . त्यांच्या प्रकाशित साहित्यकृती विविध पुरस्काराने सन्मानित आहेत .

सोयराबाई : संत , कवी आणि माणूस असा मध्यवर्ती आशय घेऊन संपन्न होत असलेले दोन दिवसीय साहित्य संमेलन एकूण सहा सत्रात विभागून होणार असून महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील नामवंतांच्या उपस्थितीत तीर्थक्षेत्र पैठण येथे शनिवार २८ व रविवार २९ सप्टेंबरला संपन्न होणार आहे.

या साहित्य संमेलनात परिसंवाद, चर्चासत्र, संत साहित्य प्रदर्शन, उद्बोधन व संत साहित्याचे देखावे असणार आहेत. याप्रसंगी संत चोखामेळा अध्यासन केंद्राचे संस्थापक सचिन पाटील, अध्यासनाच्या अध्यक्षा प्राचार्या उल्काताई चंदनशिवे , माजी खासदार प्रो



सुनिलराव गायकवाड , वृंदावन फाऊंडेशन चे उपाध्यक्ष प्रा देवीदास बिनवडे , विश्वस्त प्रा ह भ प प्रसाद महाराज माटे , ह भ प बाबूराव महाराज तांदळे ,डॉ. जयवंतराव अवघडे , समता वारी मध्यवर्ती संयोजन समिती अध्यक्षा प्रा अलका सपकाळ , धोंडप्पा नंदे , श्रीमती राऊत ए.डी , हरीश भोसले , संमेलन संयोजन समितीचे महारुद्र जाधव , ज्ञानेश्वर वाघ , शंकरराव खामकर , लक्ष्मणराव चिलवंत , भिमा जाधव आदी उपस्थित होते.

# संविधानातील मानवी मूल्यांचा जागर करण्यासाठी बार्टीची संविधान दिंडी : सुनील वारे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधीः संतांनी मानवतेची शिकवण दिली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर वारकरी संप्रदायाचा मोठा प्रभाव होता. त्यांनी मूकनायक या वृत्तपत्रात संत तुकारामाचे अभंग प्रसिद्ध केले होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये देशातील जनतेला स्वातंत्र्य समता बंधुभाव न्याय मूलभूत अधिकार आणि



कर्तव्य बहाल केली. राष्ट्राची एकता आणि एकात्मता जपण्यासाठी समता महत्त्वाची असून संविधान दैनंदिन आचरणात आणणारा ग्रंथ आहे.

संविधान दिंडीच्या माध्यमातून बार्टी संताचे समतेचे विचार आणि संविधानातील मानवी मूल्यांचा जागर करण्यासाठी बार्टीची संविधान दिंडी पालखी सोहळ्यात असल्याचे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने संत तुकाराम महाराज संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही आंळदी ते पंढरपूर पर्यंत संविधान दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. मान्यवरांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच वारकरी बांधवाना श्री सुनिल वारे यांच्या हस्ते संविधान प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले.नाना पेठ, पुणे येथे दिनांक १ जुलै २०२४ रोजी संविधान जनजागृती कार्यक्रमात शाहिर बापु पवार यांनी जगात भारी माझ्या भिमाच संविधान हा संविधान जनजागृती सांस्कृतिक, प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करून नागरिकांना संविधानाने दिलेले अधिकार व कर्तव्ये या विषयी प्रबोधन केले.संविधान उद्देशिकेचे सामुहिकपणे वाचन प्रकल्प अधिकारी सुनंदा गायकवाड यांनी केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अंकल सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते सचिन सोनताटे, ह भ प दयाराम पानझाडे, रमेश मंडोलकर, प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी, प्रकल्प अधिकारी जागृती गायकवाड, उषा भिंगारे, राहुल कवडे,समतादुत यांच्यासह वारकरी बांधव, नागरिक विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.सुत्रसंचलन प्रकल्प अधिकारी युवुस तडवी यांनी केले.आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

# माणूसकी फाउंडेशन अक्कलकोटच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी : माणूसकी फाउंडेशन अक्कलकोट च्या वतीने अक्कलकोट शहर व परिसरातील सामाजिक बांधिलकीच्या नात्याने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले . आजच्या या स्पर्धेच्या युगात हे विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपले कौशल्य दाखविण्यात कमी पडू नयेत म्हणून हा आमचा छोटासा प्रयत्न....भविष्यातील सुसंस्कृत पिढी घडविण्याचा माणूसकी फाऊंडेशन चा मानस आहे.अक्कलकोट शहर व परिसरातील दुसरी ते आठवी मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप रविवार दिनांक २ जुले २०२४ रोजी सकाळी १०:३०



वा. न प मुला मुलींची प्राथमिक मराठी शाळा नं १ येथे करण्यात आले . यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त श्री अमोलराजे भोसले कत देसाई आय क्लिनिक चे डॉ सागर पवार,सामाजिक कार्यकर्ते वैभव (राजाभाऊ) नवले उपस्थित होते

यावेळी माणूसकी फाउंडेशन चे अध्यक्ष अनंत क्षीरसागर, उपाध्यक्ष आकाश शिंदे, सचिव आशिष हुबे,योगेश महिंद्रकर,देविदास गवंडी,आकाश सुर्यवंशी मुख्याध्यापिका तडकल मॅडम, जमादार सर,साठे सर हांचाटे सर आदी शिक्षक,शिक्षिका माणूसकी फाऊंडेशन सदस्य उपस्थित होतेमाणूसकी फाउंडेशन च्या या उपक्रमात आपण मोलाची साथ देऊन पुढील प्रगत पिढी घडविण्यास आपला हातभार लाभला त्याबद्दल माणूसकी फाऊंडेशन च्या वतीने आपले मनःपूर्वक आभार.या उपक्रमा साठी नंदकुमार काटे,अनुप महाराज पुजारी,विक्रम चोरगे, , सुयोग शहा, मंदार नार्वेकर,योगेश बाबर,राहुल धस,छोटू यादव,अमित चव्हाण,संदीप रसाळ, राकेश कानडे,बाबुषा भालके,प्रज्योत अचलेर,किरण आंबट,सचिन पवार,धनाजी वणवे,महादेव पवार,संदीप वाले,झुंजे मालक, विनय जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले आपली अशीच मोलाची साथ व सहकार्य सदैव सोबत राहू दे. ही अपेक्षा. सूत्रसंचालन जमादार सर तसेच प्रास्ताविक तडकल मॅडम व आभार सुरवसे यांनी मानले

# विद्यापीठ परिसरात वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

धाराशिव/सुधाकर रणदिवेः डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप परिसरात हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठ उप परिसराचे संचालक प्रा. डॉ.प्रशांत दीक्षित यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी सहाय्यक कुलसचिव भगवान फड, कक्षा अधिकारी विद्याधर गुरव, विद्यार्थी विकास विभाग समन्वयक डॉ. विक्रम शिंदे, कमवा व शिका योजना समन्वयक डॉ. गोविंद कोकणे, व्यवस्थापन शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुयोग अमृतराव, वरिष्ठ सहाय्यक श्रीकांत सोवितकर, ग्रंथालय सहाय्यक मल्लिनाथ लामजने, वरिष्ठ सहाय्यक संजय जाधव, शिवाजी माने ,चंद्रकांत



आनंदगावकर, विश्वास कांबळे, कार्यालयातील कर्मचारी अशोक लोंढे, प्रमोद इंगळे, मस्के,विठ्ठल कसबे,दशरथ कवडे, शिवाजी वाघमारे, इत्यादी उपस्थित होते.

# डॉ. बी.पी.रोंगे, डॉ. प्रशांत पवार व प्रा.बी.डी. गायकवाड यांच्या पेटंटला भारत सरकार कडुन मान्यता

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाअंतर्गत असलेल्या वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांच्या पेटेंटला भारत सरकारकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे. 'ॲप्टरस फॉर मेजरिंग एलोगेनेशन ऑफ कन्वेर चेन अँड लाईफ इस्टीमेशन देअर ऑफ' या विषयावर प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांनी या शोध पेटंटची निर्मिती केली आहे. साखर




कारखान्यातील अवजड मशीनसमध्ये असलेल्या कन्वेअर चेकच्या टेस्टिंग साठी याचा उपयोग होतो. डॉ. बी.पी. रोंगे, डॉ. प्रशांत पवार व प्रा.बी.डी. गायकवाड यांच्या या पेटंटला भारत सरकार कडुन मान्यता मिळाल्याबद्दल वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व मान्यवर, अधिष्ठाता, विभागप्रमुख व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. संशोधन विभागाच्या प्रगतीचे द्योतक असणाऱ्या या पेटंट मुळे संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड यांचे अभिनंदन केले.

# जिल्हा परिषद कन्नड मुली शाळेला सायकल वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत महिला बालकल्याण यांच्याकडून शाळेपासून लांब राहणारा विद्यार्थिनींना शाळेला ये जा करण्यासाठी मोफत सायकल देण्याचे सोयीस्कर जिल्हा परिषद कडून नियोजन आहे या नियोजन अंतर्गत जिल्हा परिषद कन्नड मुली शाळा मैंदर्गी




या शाळेतील सहा मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात आले यावेळी अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री शंकर कवितके यांचे हस्ते वाटप करण्यात आले यावेळी अक्कलकोट गटशिक्षण अधिकारी श्री प्रशांत अरबाळे शिरवळ केंद्राचे केंद्रप्रमुख श्री इंद्रसेन पवार साहेब सलगर चे उपसरपंच काशिनाथ कुंभार समर्थ नगरचे ग्रामपंचायत सदस्य मोनेश्वर नेरगल नागोर चे सरपंच विजयकुमार चव्हाण अक्कलकोट पंचायत समितीचे वरिष्ठ सहायक लेखा श्री अनिल बिराजदार कन्नड प्रेमी श्री शिवानंद गोगाव व शाळेचे मुख्याध्यापक श्री महांतेश्वर कट्टीमनी यांचे सह लाभार्थी विद्यार्थिनी सायकल सह उपस्थित होते .

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडाळाच्या वर्धापनदिन धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन









**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः राज्यातील धार्मिक क्षेत्रात नियोजनबध्द मांडणी आणि आखणी असलेल्या सामाजिकतेच्या बरोबरच विविध क्षेत्रात उल्लेखनिय व नेत्रदीपक प्रगतीची वाटचाल करीत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३७ वा. वर्धापनदिन आणि श्री गुरूपोर्णिमा उत्सवानिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक या कार्यक्रमाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष असून, दि. ११ जुलै ते २१ जुलै २०२४ पर्यंत आयोजन करण्यात आल्याची माहिती न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. सदरची पत्रकार परिषद अन्नछत्र मंडळात संपन्न झाली.

दि. ११ जुलै रोजी गुरुवार सायंकाळी ६.३० मिनीटानी कार्यक्रमास प्रारंभ होणार असून, अक्कलकोट विरक्त मठाचे श्री म.नि.प्र. पूज्य बसवलिंग महास्वामीजी, प.पू.श्री मोहन पुजारी – मुख्य पुजारी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट, वे.शा.सं.श्री अण्णू महाराज –पुजारी श्री स्वामी समर्थ समाधी मठ अक्कलकोट, तहसिलदार विनायक मगर, अक्कलकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावर, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शंकरराव कवितके, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थाचे प्रतिमाचे पूजन, दिप प्रज्वलनाने सदर कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

✻ दि. ११ जुलै रोजी गुरुवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत नक्षत्रांचे देणे, थोर संगित दिग्दर्शक व गायक पद्मश्री पंडीतजी हृदयनाथ मंगेशकर, राधा मंगेशकर आणि सहकारी मुंबई यांचा कार्यक्रम सादर होणार आहे. ✻ दि. १२ जुलै रोजी शुक्रवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'एक भाव मैफिल' स्वर आर्या लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते आर्या आंबेकर व सहकलाकार मुंबई यांचा कार्यक्रम सादर होणार आहे. ✻ दि. १३ जुलै रोजी शनिवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत आदेश बांदेकर प्रस्तुत 'खेळ मांडीयेला' (खेळ, किस्से, गप्पा, साऱ्या कुटुंबासाठी) हा कार्यक्रम होणार आहे. ✻ दि. १४ जुलै रोजी रविवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी यांच्या शुभाशिर्वादाने सादरकर्ते कर्नाटकचे ख्यातनाम गायक राजेश कृष्णन व नशश कन्नड वाहिनीच्या प्रसिध्द निवेदिका अनुश्री आणि सहकारी बेंगळूर यांचा 'संगीत संजे' कन्नड कार्यक्रम सादर होणार आहे. ✻ दि. १५ जुलै रोजी सोमवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत ख्यातनाम व्याख्याते प्रा.नितीन बानुगडे–पाटील यांचे 'छत्रपती संभाजी महाराज' या विषयावर व्याख्यान सादर होणार आहे.✻ दि. १६ जुलै रोजी मंगळावर सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'किर्तन' राष्ट्रीय किर्तनकार व समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांचा कार्यक्रम होणार आहे. ✻ दि. १७ जुलै रोजी बुधवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत महाराष्ट्राचे हास्य जत्रा सादरकर्ते समीर चौगुले, ओंकार राऊत, ईशा डे, प्रसाद खांडेकर, चेतन भट, अरुण कदम, प्रभाकर मोरे, वनित खरात, नम्रता संभेराव, शाम राजपूत, पृथ्वीक प्रताप यांचा धमाल उडवणारा कार्यक्रम होणार आहे. ✻ दि. १८ जुलै रोजी गुरुवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'स्वर संध्या' सादरकर्ते – महेश काळे आणि सहकारी, पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे.✻ दि. १९ जुलै रोजी शुक्रवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'भक्तिरंग' भक्तिगीते, भावगीते व नृत्य सादरकर्ते संस्कृती बालगुडे आणि सहकलाकार पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे. ✻ दि. २० जुलै रोजी शनिवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, निपाणी प्रस्तुत 'सुर भक्तीचे उमटले' भक्ती संगीत कार्यक्रम होणार आहे. ✻ दि. २१ जुलै रोजी गुरूपौर्णिमे निमित्त रविवारी सकाळी ७ ते ९ पर्यंत महाप्रसादगृह येथे श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० पर्यंत नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा, सकाळी १० वा. खालील मान्यवरांच्या हस्ते श्रींची महाआरती व महानवैद्य दाखविण्यात येणार आहे.

दि. २१ जुलै रोजी रविवार सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद, सायं ४ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी, आणि न्यासाच्या सुशोभित केलेल्या रथाच्या भव्य मिरवणूकीचा दिंड्या व वाद्यांचा गजरात आणि अतुल बेहरे पुणे यांच्या 'नांदब्रम्ह' या ढोलपथकाच्या तालात आणि अमोलराजे लेझिम संघाच्या शानदार खेळाने शुभारंभ बाळासाहेब दाभेकर –अध्यक्ष भरत मित्र मंडळ पुणे,भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजीराजे पवार, सो.म.पा. नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, सो.म.पा. मा.स्थायी समिती चेअरमन व शहर–जिल्हाध्यक्ष (काँग्रेस) चेतन नरोटे, सो.म.पा. माजी उपमहापौर दिलीप (भाऊ) कोल्हे, सो.म.पा.मा.शिक्षण सभापती संकेत पिसे, कासुर्डी (खे), ता.भोर, जि. पुणेचे देणगीदारसंतोष कोंडे यांच्या हस्ते पालखी व रथ मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

दि. १९ जुलै ते २१ जुलै पर्यंत 'रक्तदान शिबीराचे' आयोजन करण्यात आलेले आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व निवेदन श्र्वेता हुल्ले या करणार आहेत. तरी सदरच्या कार्यक्रमाचा लाभ महाराष्ट्रासह, कर्नाटक आणि अन्य राज्य व परदेशातील स्वामी भक्तांनी घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांनी केले आहे. यंदाच्या वर्षी सदरचे कार्यक्रम होणार असून कार्यक्रमाचे हे २५ वे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे.

सध्या आषाढी वारी निमित्त दररोज हजारों स्वामी भक्त अन्नछत्र मंडळात येत आहेत. उभी स्वामींची मुर्ती, महाप्रसादगृह, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, वाटिका व बालोउद्यान, शिवचरित्र धातू शिल्प प्रदर्शन हे पाहण्यासाठी स्वामी भक्तांची मोठी गर्दी होत आहे. यात्री निवास, यात्री भवन, प्रशस्त वहानतळ स्वामी भक्तांनी गजबजलेले व फुलून गेले आहेत.

या पत्रकार परिषदेस मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, वास्तुविशारद योगेश अहंकारी, मनोज निकम, अभियंता किरण पाटील, संतोष भोसले, अमित थोरात, व न्यासाचे विश्र्वस्त, क्रियाशील सभासद, सेवेकरी व कार्यकर्ते हे उपस्थित होते.

**नूतन महाप्रसादगृह इमारतीचा भूमिपूजन समारंभ :** दि. २१ जुलै रोजी रविवार सकाळी ११ वा. गुरूपौर्णिमे निमित्त नियोजित ५ मजली भव्य अशा महाप्रसादगृह इमारतीचा भूमिपूजन समारंभ – राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व सोलापूरचे पालकमंत्री ना. चंद्रकात पाटील, राज्य अधिस्वीकृती समिती, महाराष्ट्र शासनाचे अध्यक्ष व दै.लोकमत, मुंबईचे सहयोगी संपादक यदुभाऊ जोशी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, कायदेविषयक सल्लागार व जेष्ठ विधिज्ञ अँड. नितीन हबीब सोलापूर, अखिल मंडई मंडळ पुणेचे अध्यक्ष व न्यासाचे विश्र्वस्त जनार्दन उर्फ अण्णा थोरात, कैलास वाडकर (देणगीदार व पालखी संयोजक शिरवळ, पुणे), अतुल शिंदीकर (देणगीदार, ठाणे प.) यांच्या हस्ते आणि अतिथींच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.

**एक दृष्टिक्षेप– नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर :** नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य– भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. सदर इमारतीचे बांधकाम करण्याची पुर्वतयारी झाली असुन, ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे. या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे आणि अल्पावधीतच या इमारतीचे बांधकाम सुरू करण्याचा मानस आहे.


न्यासाकडून अग्निशामक व रुग्णवाहिकेचा देखील उत्तम सोय केलेली आहे. याबरोबरच तयार केलेल्या कार्यक्रम पत्रिकेत पाणी आडवा –पाणी जिरवा –पाण्याचा अपव्यय टाळा. पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्षरोपण व वृक्ष संवर्धन करा. स्वच्छता अभियान राबवू भारत –महाराष्ट्र अक्कलकोट स्वच्छ करू. बेटी बचाओ–बेटी पढावो.पाणी हे जीवन आहे. स्त्रीभ्रुण हत्या टाळा.✻ आपला अन्नछत्र –स्वच्छ अन्नछत्र हा संदेशामुळे विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. न्यासाला देणगीदारास आयकरात ८० – जी कलमान्वे सवलत आहे.

**गुणीजन व गुणवंत विद्यार्थी पुरस्कार :** दि. ११ जुलै ते २० जुलै दरम्यान गुणीजन व गुणवंत विद्यार्थी पुरस्कार व सत्कार हे सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**विशेष सहकार्य :** नागपूरचे उद्योगपती आशिष फडणवीस, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, सोलापूरचे कायदेविषयक सल्लागार व जेष्ठ विधिज्ञ अँड. नितीन हबीब, पुणेचे चार्टर्ड अकाऊंटट महेश गावसकर यांचे विशेष सहकार्य आहे. याबरोबरच श्री स्वामी समर्थ समाधी मठ – समस्त पुजारी मंडळ, बुधवार पेठ अक्कलकोट, सर्व प्रसार माध्यमे, पत्रकार, अक्कलकोट नगरपरिषदेचे अधिकारी कर्मचारी, उत्तर व दक्षिण पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, अरविंद शिंदे, लेखापरीक्षक ओंकारेश्र्वर उटगे, अँड. संतोष खोबरे, अमोलराजे मित्र मंडळ, जयहिंद फूड बँक व रॉबीनहुड आर्मी अक्कलकोट, न्यासाचे विश्र्वस्त, क्रियाशील सभासद, सेवेकरी व कार्यकर्ते यांचे सहकार्य असते.

**समर्थ महाप्रसाद सेवा :** अक्कलकोट शहरातील निराधार, दिव्यांग व गरीब–गरजूंना दैनदिन दोन्ही वेळेचे जेवण डब्यातून पुरविण्याचा स्तुत्य निर्णय घेण्यात आल्या प्रमाणे लाभार्थ्यांच्या पत्त्यावर सदर जेवणाचा डबा दररोज २५० जणांना देण्यात येतो. याबरोबरच समर्थ महाप्रसाद सेवाच्या लाभार्थ्यांना स्वेटरचे वाटप करण्यात आले.

**कुस्तीगरांसाठी दर महा खुराकाचे कीट वाटप :** तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७६ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवशयक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थांचे कुस्तीगरांसाठी या जीनंसांचा समावेश आहे.



## छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बार्टीच्यावतीने शिवदारे कॉलेजमध्ये वृक्षारोपन संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी सोलापूर यांच्या मार्फत शिवदारे कॉलेजमध्ये छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी वृक्षारोपण आणि व्याख्यान कार्यक्रम आयोजन करण्यात आले होतें.

यावेळ तज्ञ व्याख्याते डॉ.मिनल गायकवाड यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्य सविस्तर स्वरूपात समजावून सांगितले. तसेच व्यसनमुक्ती या विषयावर देखील मार्गदर्शन केले.बहुजन समाज्याच्या सामाजिक उन्नतीसाठी त्या काळात शाहू महाराज यांनी केलेल्या कामाबाबत मार्गदर्शन केले. परिवर्तन ना गती प्राप्त करून दिली.राजा असून ही त्यांनी दिन दलितांना शोषित वर्गाचे दुःख जाणून जवळीक साधली कार्यक्रम सुरवात संविधान वाचन करण्यात आले. नंतर दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे,कॉलेज चे प्राचार्य डॉ.डी.एस.सुत्रावे, बार्टीच्या प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी द. सोलापूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री राजशेखर शिवदारे सर, कॉलेज प्राचार्य डॉ. डी. एस. सूत्रवे सर, समतादूत अस्विनी सुपाते, राजेश्री कांबळे आणि जोती ओवळ उपस्थिती होतें.सूत्रसंचालक डॉ. दामोदर बनसोडे, प्रास्तविक प्रणिता सोनकांबळे बार्टी प्रकल्प अधिकारी , प्रमुख वक्त्या डॉ. मीना गायकवाड मॅडम, आभार प्रदर्शन प्रा.चंद्रशेखर उमरजकर.

## स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या पंचायत समितीतच महिलांची कुचंबना

### स्वतंत्र स्वच्छालय नसल्याने महिलांना सहन करावे लागते ना हा त्रास

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पंढरी नगरीत आषाढी वारीच्या दरम्यान स्वच्छता दिंडीच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील येणाऱ्या भाविकांना स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या पंढरपूर पंचायत समिती तसेच पंढरपूर शहरातील ठिकठिकाणी महिलांची कुटुंबांना होताना दिसत आहे पंढरपूर शहरात ग्रामीण भागातून तसेच शहरातील विविध कामानिमित्त शहरात येत येतात तसेच आणि हजारो महिला भाविक पंढरपूरमध्ये दर्शनासाठी येतात परंतु या ठिकाणी शेकडो महिलांना स्वच्छालय जी पुरेशी सोय नसल्याने मोठ्या प्रमाणात नाहक त्रास सहन करावा लागत आहे मात्र असे असले तरी नगरपालिका आणि पंचायत समितीकडून गेल्या अनेक वर्षात यावर कसलाही ठोस पावली उचलली जात नसल्याने केवळ देखावासाठी स्वच्छता दिंडी काढली जाते का असा प्रश्र्न महिला वर्गातून उपस्थित केला जात आहे

पंढरपूर पंचायत समिती श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मुळे संपूर्ण राज्यभरातून येणाऱ्या भाविक भक्तांना परिचित असलेले पंचायत समिती आहे व पंचायत समिती मार्फत आषाढी तसेच कार्तिकी वारीच्या दरम्यान स्वच्छता दिंडीच्या मार्फत थेट मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री असते या दिंडीचा शुभारंभ करून संपूर्ण राज्यभरातील भाविक भक्तांसाठी स्वच्छता संदेश दिला जातो तसेच स्वच्छतेच्या कामासाठी दरवर्षी खोट्यावधी रुपयांचा खर्चही केला जातो तर दुसरीकडे मात्र पंचायत समितीच्या दुर्लक्षामुळे येथे कामासाठी येणारे शेकडून महिलांना स्वच्छालय जी पुरेशी सोयीद नसल्याने मोठी कुचुंबना व त्रास सहन करावा लागत आहे पंचायत समितीच्या पाठीमागील बाजूस पुरुषांसाठी मुतारी तसेच स्वच्छालय ची सोय आहे मात्र यावेळी महिलांसाठी केवळ एकच स्वच्छालय असून तेही जीर्ण तो बंद अवस्थेत असलेली दिसून येत आहे त्यामुळे महिलांची होणारी गैरसोय पंचायत समिती आणि नगरपालिका कधी थांबणार असा प्रश्र्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे

यावेळी सोलापूर जिल्हा महिला अध्यक्ष वर्षाताई शिंदे यांनी सर्व ठिकाणची माहिती करून पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व पंढरपूर नगरपालिकेचे शिव यांना भेटून निवेदन देण्यात आले यावेळी त्यांना शहरातील वादळीच्या प्रमुख ठिकाणांची पाहणी करून तसेच सूचना सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आगामी येणाऱ्या आषाढी सोहळयाच्या अगोदर सर्व सुविधा महिलांसाठी उपलब्ध करून द्याव्यात यावेळी त्यांच्या समेत राष्ट्रवादी पार्टी जिल्हाध्यक्ष सोलापूर उषाताई शिंदे रमेश शिंदे तालुका अध्यक्ष एडवोकेट सुखी शनी बागल तालुका उपाध्यक्ष रुपाली रणदिवे रेखा यादव तालुका सदस्य वर्षा भोसले इत्यादी उपस्थित होती

